गद्य आकलन

आकलन करताना दिलेला उतारा नीट वाचून त्यातील मुख्य विचार समजून घेणे म्हणजेच **उताऱ्याचे आकलन** होय.

गद्याचे आकलन करताना घ्यावयाची काळजी :

- गद्य उतारा काळजीपूर्वक वाचून उताऱ्याचा विषय समजून घ्यावा.
- उताऱ्यातील मुख्य आशय सांगण्यासाठी दिलेले दाखले, कथन केलेली उदाहरणे अधिक समजावून घ्यावीत.
- दिलेले दाखले, कथन केलेली उदाहरणे यांचा उपयोग लेखकाने कसा केला आहे हेसुद्धा समजावून घ्यावे.
- नवीन शब्द, वाक्प्रचार आणि म्हणी यांचा संदर्भानुसार अर्थ लावण्याचा प्रयत्न करावा.
- गद्य उताऱ्याच्या सुमारे एकतृतीयांश इतका सारांश लिहावा.
- हा सारांश विद्यार्थ्यांनी स्वत:च्या भाषेत सुसंगतपणे लिहावा.
- उताऱ्यातील विषय अधिक स्पष्ट करण्यासाठी वापरलेले दाखले, उदाहरणे यांचा सारांश लिहिताना वापर टाळावा.
- सारांश उताऱ्याला समर्पक शीर्षक द्यावे.

कृ.१. दिलेल्या उताऱ्याचा स्वत:च्या शब्दांत भावार्थ लिहा.

साने गुरुजींची 'श्यामची आई' म्हणजे कुमारांची जणू गीताच आहे; पण ज्याला 'साने गुरुजी' म्हणजे काय हे समजून घ्यायचे आहे, त्याने 'श्यामची आई' पुन: पुन्हा वाचली पाहिजे, पारायणे केली पाहिजेत. प्रत्येक माताच प्रेममयी असते व आपल्या मुलांसाठी ती कोणताही त्याग करायला मागेपुढे पाहणार नाही, हे खरे; पण गुरुजींची आई एक विलक्षण स्त्रीरत्न असले पाहिजे. आभाळ फाटावे तसा त्या माउलीचा संसार फाटत चालला होता; पण ती जिवाचे रान करून तो सावरू पाहत होती. घरात खायची ददात, धड वस्त्रांची टंचाई, पोराबाळांच्या शिक्षणाला दमडा नाही; पण श्यामची आई डगमगली नाही. आपल्या मुलांच्या मनाला उदात्त, सुंदर वळण लावण्यासाठी ती आमरण झिजली. साने गुरुजींच्या जवळ जे जे काही सुंदर होते, देण्यासारखे होते, ते ते तिने त्यांना दिलेले होते. मनुष्यावरच नव्हे, तर गाईगुरांवर, फुलपाखरांवर,

झाडामाडांवर प्रेम करायला तिने शिकवले. स्वत:च्या मुलाचे कोणीही कोडकौतुक करील; परंतु दुसऱ्याच्या मुलांचेही तितक्याच प्रेमाने करावे, हे तिने शिकवले. तिच्या प्रेमाने, तिच्या रागाने, तिच्या अश्रूंनी गुरुजींचा मन:पिंड बाळसेदार झाला.

(वसंत बापट – जिंकुनी मरणाला)

उत्तर: **'कुमारांची गीता'**

साने गुरुजींची 'श्यामची आई' म्हणजे कुमारांची गीताच. त्यागमूर्ती गुरुजींची आई फाटक्या संसारात जिवाचे रान करून आपल्या मुलांना शिक्षण देण्यासाठी, त्यांना उदात्त व सुंदर वळण लावण्यासाठी आमरण झिजली. तिने जे जे सुंदर उदात्त, देण्यासारखे आहे ते ते गुरुजींना देऊन मनुष्याव्यतिरिक्त जीवसृष्टीवरही प्रेम करायला शिकविले. अशा त्या विलक्षण स्त्रीरत्नाच्या (आईच्या) प्रेमाने, रागाने, अश्रूंनीच गुरुजींचा मन:पिंड बाळसेदार झाला.

क्र.२. दिलेल्या उताऱ्याचा स्वत:च्या शब्दांत भावार्थ लिहा.

दुर्बळाला काही करता येत नाही. एक बलवान येतो व शेकडो लोकांना नमवितो. बळ नसेल, तर शारीरिक हालचाली नाहीत, ज्ञानानुभव मिळणार नाही व गुरुसेवाही होणार नाही. दुर्बळाला हास्य आणि दु:ख सदैव ठेवलेले, शरीर सर्व गोष्टींचा पाया आहे. या शरीराकडे दुर्लक्ष करणे हे पाप आहे. तो देवाचा व समाजाचा घोर अपराध आहे.

बळ मिळविण्यासाठी शरीराला व्यायाम हवा. व्यायामाचे अनेक प्रकार आहेत. लाठी, दांडपट्टा यांसारखे नानाप्रकारचे सुटसुटीत सांघिक खेळ भारतात आहेत. खेळासारखी पवित्र वस्तू नाही. खेळात आपण अनेक गोष्टी शिकतो. खेळ म्हणजे निष्ठा, खेळ म्हणजे सत्यता, खेळ म्हणजे स्वत:चा विसर. आसनांनीही शरीराचे आरोग्य सुधारते. काम करताना मिळणारा व्यायाम हा सर्वोत्कृष्ट व्यायाम होय. व्यायाम हासुद्धा काहीतरी निर्माण करणारा हवा.

जुने लोक पाहिले तर त्यांची शरीरे निरोगी दिसतात; परंतु हल्ली शरीरे तक्लुबी झाली आहेत. पांढरपेशांची अशी दैना आहे, तर श्रमजीवी लोकांचीही शरीरे विसावा व अन्न यांच्या अभावी

कृश होत आहेत. श्रमहीनांस श्रम करावयास लावल्याशिवाय व श्रमिकांस भरपूर अन्न व विश्रांती दिल्याशिवाय सुदृढ होणार नाहीत.

(साने गुरुजी)

उत्तर: **'व्यायामाचे महत्त्व'**

दुर्बलांनी आपल्या शरीराकडे दुर्लक्ष केले तर तो देवाचा व समाजाचा अपराध आहे. त्यांनी बळ मिळविण्यासाठी लाठी, दांडपट्टा यांसारखे खेळ खेळावेत; कारण खेळ म्हणजे पवित्र निष्ठा, सत्यता व स्वतःचा विसर. आसनांनीसुद्धा आरोग्य सुधारते, शारीरिक कष्ट हा सर्वोत्कृष्ट व्यायाम होय. मागील पिढीतील लोकांची शरीरे निरोगी, तर हल्लीच्या लोकांची शरीरे तक्लुबी झाली आहेत. हल्ली कष्टकऱ्यांची शरीरे विश्रांती व अन्नाअभावी कृश आहेत. श्रमहीनांना कष्टाची कामे व श्रमजीवींना भरपूर अन्न व विश्रांती दिल्याशिवाय देश समृद्ध होणार नाही.

कृ.३. दिलेल्या उताऱ्याचा स्वत:च्या शब्दांत भावार्थ लिहा.

पाठांतराची लाज बाळगणे, हे रानटीपणाचे लक्षण आहे. मानवी प्राण्याने ज्या शक्तींचा विकास जाणूनबुजून केलेला आहे त्या शक्ती वाढवणे आणि त्यांचा वापर करणे, हे प्रगतीचे लक्षण आहे. जो पुष्कळ पाठ करतो, त्याच्यापुढे नाना प्रकारची ज्ञाने नेहमी हात जोडून उभी असतात आणि त्याने खूण करताच ती त्याच्या सेवेला सादर होतात. जे पाठ करत नाहीत त्यांना बारीकसारीक कामासाठीसुद्धा कोश पाहावे लागतात, संदर्भस्थळे हुडकावी लागतात किंवा कोणालातरी जाऊन विचारावे लागते. हा सर्व कामाचा अपव्यय होय आणि हे जर केले नाही, तर अनिश्चित ज्ञानावर विसंबून त्याला आपली विधाने करावी लागतात; म्हणून लहानपणाच्या काळात वस्तू स्मृतिनिबद्ध करण्याची सवय वाढविली पाहिजे. 'कमावणे' हा शब्द केवळ कातड्यालाच लागू नाही, तो मनाच्या शक्तींनाही लागू आहे. स्मृती एकदा कमावली म्हणजे ती समावेशक आणि चिवट बनते. तिच्या कोशात पुष्कळ वस्तू मावतात आणि त्यांचा कब्जा ती सहसा सोडीत नाही. हे भांडवल माणसाला मरेपर्यंत पुरते; म्हणून नमुनेदार विद्यार्थी बनू इच्छिणाऱ्याने पाठांतराचा सपाटा कायम ठेवला पाहिजे.

उत्तर: **'पाठांतराचे महत्त्व'**

पाठांतराची लाज बाळगणे, हे रानटीपणाचे लक्षण आहे. जो विद्यार्थी ही लाज बाळगत नाही त्याच्यासमोर ज्ञानाची दालने खुली असतात; पण जो विद्यार्थी पाठांतर

करत नाही, त्याला बारीकसारीक संदर्भ शोधण्यासाठी कोश पाहावे लागतात. असा विद्यार्थी नमुनेदार विद्यार्थी होऊच शकत नाही. जसे ग्रंथ हे गुरू मानले जातात, तसेच पाठांतर ही आयुष्याची शिदोरी आहे. पाठांतर हेच आयुष्याचे खरे भांडवल आहे. नमुनेदार, आदर्श विद्यार्थी होण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने पाठांतराचा सपाटा कायम ठेवला पाहिजे.

कृ.४. दिलेल्या उताऱ्याचा स्वत:च्या शब्दांत भावार्थ लिहा.

ज्या जगात मी आलो, ते जग मृत्यूपूर्वी मी सुंदर करून जाईन अशी जिद्द हवी. केवळ विद्यार्थ्यांबद्दल नव्हे, तर आपल्या सर्वच समाजाबद्दल माझी ही तक्रार आहे, की आपण जीवनाकडे पाहतच नाही. तरुण असंतुष्ट म्हणून ओरड होते. मी म्हणतो, तरुण असंतुष्ट नाहीत तो देश काय आहे? तरुणांनी असंतुष्ट राहिले पाहिजे; पण ते या अर्थाने, की त्यांनी जीवनाचे आव्हान स्वीकारावे. "प्राप्त काल हा विशाल भूधर, सुंदर लेणी तयात खोदा," असे केशवसुतांनी सांगितले आहे. त्यातील 'लेणी' हा शब्द फार सुंदर आहे. त्यांनी 'चित्रे रंगवा' असे म्हटले नाही, तर कलानिर्मिती ही त्याहून अवघड कामगिरी आहे. ही निर्मिती सहजासहजी होत नाही. त्यासाठी पत्थर फोडून त्याच्याशी झुंज द्यावी लागते. हे आव्हान तुम्ही स्वीकारा, तशी जिद्द बाळगा, एवढेच माझे आजच्या तरुण पिढीला सांगणे आहे.

उत्तर: **'तरुणांनो ! लक्षात घ्या.'**

तरुण पिढीला लेखक सांगतात, की केशवसुतांच्या म्हणण्याप्रमाणे तरुणांनी, लेणी खोदण्याचे आव्हान स्वीकारले पाहिजे. आपण ज्या जगात राहतो, तेथे असंतुष्ट राहून ओरड करू नका. जग सुंदर करण्यासाठी आव्हान स्वीकारा. खडक फोडण्यासारखी झुंज देऊनच कलाकृती निर्माण होते; पण हे आव्हान स्वीकारा व तशी जिद्द बाळगा.

सरावासाठी उतारे

कृ.१. दिलेल्या उताऱ्याचा स्वतःच्या शब्दांत भावार्थ लिहा.

आपल्या जीवनामधील फार मोठी चूक जर कोणती असेल, तर ती ही, की आपण ध्येयाकडे इतके आकर्षिले जातो, ते आपल्याला इतके मोहक वाटते, की ते प्राप्त करून घेण्याच्या साधनांच्या तपशिलाकडे आपले दुर्लक्ष होते.

जेव्हा जेव्हा आपल्याला अपयश येते, तेव्हा तेव्हा अगदी बारकाईने त्याचे पृथक्करण केल्यास शेकडा

नव्याण्णव वेळा आपल्याला असे आढळून येते, की आपण साधनांकडे पुरेसे लक्ष दिले नाही हेच आपल्या अपयशाचे कारण आहे. साधने परिपूर्ण आणि बलवत्तर करण्यासाठी त्यांच्याकडे योग्य लक्ष देणे हे आपल्यापक्षी आवश्यक आहे. साधने योग्य व परिपूर्ण असतील, तर ध्येय प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाही. आपण ही गोष्ट विसरून जातो, की कारणापासूनच कार्याची उत्पत्ती होते, कार्य आपोआप निर्माण होत नाही आणि कारणे योग्य, बरोबर व बलवान असल्याखेरीज कार्याची निर्मिती होणार नाही. एकदा ध्येय ठरवले व त्याची साधने निश्चित केली, की मग आपण ध्येयाचा विचार करणे प्राय: सोडून दिले तरी हरकत नाही, कारण आपल्याला खात्री असते, की साधने परिपूर्ण झाल्यावर ध्येयप्राप्ती झाल्यावाचून राहणार नाही.

(स्वामी विवेकानंद)

कृ.२. दिलेल्या उताऱ्याचा स्वत:च्या शब्दांत भावार्थ लिहा.

मनुष्य किती उंच जाऊ शकतो हे दाखविणारी माणसे पूर्वी होऊन गेली व आजही आपणांत आहेत, ही अनुभवाची गोष्ट आहे. या नरदेहाची काय शक्ती आहे हे दाखविणारे संत मागे झाले व आजही आहेत. या देहात राहून मनुष्य जर एवढी अचाट करणी करू शकतो, तर मग माझ्या हातून का बरे होणार नाही? मी माझ्या कल्पनेला मर्यादा का बरे घालू? ज्या नरदेहात राहून दुसरे नरवीर झाले, त्याच नरदेहात मीही आहे. मग मी असा का? काहीतरी माझे चुकते आहे. हे माझे चित्त सारखे बाहेर जात आहे. दुसऱ्याचे दोष पाहण्यात ते मोठे फाजील झाले आहे. परंतु मी दुसऱ्याचे दोष कशाला पाहावे? 'कासया गुणदोष पाहों आणिकांचें। मज काय त्यांचे उणें असे।।' माझ्या ठिकाणी दोष का कमी आहेत? मी सदैव दुसऱ्यांचेच बारीकसारीक दोष पाहण्यात दंग झालो, तर चित्ताची एकाग्रता कशी साधणार? मग मला दोनच स्थिती प्राप्त होतील. शून्यावस्था म्हणजे झोप येईल किंवा अनेकाग्रता. तमोगुण व रजोगुण यांतच मी गुरफटणार.

भगवंतांनी असा बस, असे डोळे ठेव, असे आसन घाल इत्यादी सूचना एकाग्रतेसाठी दिल्या नाहीत असे नाही; परंतु चित्ताची एकाग्रता अवश्य आहे हे पटले, तर या सर्वांची उपयुक्तता. चित्ताची एकाग्रता अवश्य आहे हे प्रथम एकदा मनुष्याला पटू दे म्हणजे मग तो स्वत:च साधना शोधून काढील.

(आचार्य विनोबा भावे)